N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** समर्थ
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0245 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/11/2025 03:47

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** रविवार **Date From (दिनांक पासून):** 02/11/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/11/2025
**Time From (वेळेपासून):** 13:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/11/2025 **Time (वेळ):** 03:19 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 007
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/11/2025 03:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** उंटाडया मारुती मंदिर ,परिसरामध्ये रास्ता पेठ पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** समर्थ
**District(State) (जिल्हा(राज्य)):** पुणे शहर(महाराष्ट्र)



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. प्रसाद माणिक लोणारे पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1974

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,समर्थ ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,समर्थ ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9923444998

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री प्रमोद रविंद्र चिंतामणी पोलीस उप निरीक्षक | | | 1. आर्थिक गुन्हे शाखा,पिंपरी चिंचवड,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत<br>2. फ्लँट क्र 504, सोपान, रेसीडेन्सी, गंगोत्री पार्क,दिघी रोड, भोसरी, पुणे,भोसरी,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
मी प्रसाद माणिक लोणारे, वय-51, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9923444998मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि.13/10/2025 रोजी 17.30 वा मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तक्रारदार श्री. प्रसन्ना गोविंद लोखंडे, वय 48 वर्षे, व्यवसाय - वकिली, रा. फलँट नं 601, ई बिल्डींग, ला विदा लोका हौसींग सोसायटी, गोविंद गार्डन जवळ, पिंपळ सौदागर, पुणे 27 यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. श्री. दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तात्काळ आम्हाला सदर कारवाई करीता प्रादेशिक परिवहन विभाग या विभागाचे पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. नमुद तक्रारदार यांना आम्ही आमचे कक्षामध्ये घेऊन येऊन त्यांना त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरामध्ये लिहुन देण्यास सांगीतली असता त्यांनी ती लिहुन दिली. त्यादरम्यान 18.20 वा चे सुमारास प्रादेशिक परिवहन विभाग या विभागाचे श्री. बालाजी विठ्ठल मोरे, वय 37 वर्षे, पद - कनिष्ठ लिपीक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे व श्री. निलेश प्रकाश वाघले, वय 38 वर्षे पद - कनिष्ठ लिपीक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे हे पंच म्हणुन हजर झाले. नमुद पंच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर झाल्यानंतर आम्ही नमुद पंच यांना आमची ओळख करुन देऊन तक्रारदार व पंचांची एकमेकांसोबत ओळख करुन दिली. नमुद पंच यांना तक्रारदार श्री. प्रसन्ना लोखंडे यांची लोकसेवकाविरुध्द तक्रार असुन आपण सदर कारवाई करीता पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात का? असे विचारले असता दोन्ही पंचानी कारवाई करीता पंच म्हणुन काम करण्यास होकार दिला. नमुद कारवाई करीता पंच क्रं 1 म्हणुन श्री. बालाजी विठ्ठल मोरे, वय 37 वर्षे, पद - कनिष्ठ लिपीक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे हे व पंच क्रं 2 श्री. निलेश प्रकाश वाघले, वय 38 वर्षे पद - कनिष्ठ लिपीक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे. हे काम पोहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार लोखंडे यांना आम्ही त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतली त्यांनी ती कथन केली ती खालीलप्रमाणे. मी श्री. प्रसन्ना गोविंद लोखंडे वय 48 वर्षे, व्यवसाय - वकिली, रा. फलँट नं 601, ई बिल्डींग, ला विदा लोका हौसींग सोसायटी, गाविंद गार्डन जवळ, पिंपळ सौदागर, पुणे 27 मोनं 8657614438 "मी वरीलप्रमाणे असुन, मी अँड प्रसन्ना गोविंद लोखंडे मागील 2017 पासुन वकीली व्यवसाय करतो. बावधान पो.स्टे. गु.र.नं. 256/2025 मध्ये मी आरोपी नामे तुरुमलशेट्टी वेंकटेश्वर राव यांचे वकीलपत्र घेतले आहे व त्यांचे संपुर्ण काम मी पाहत आहे. या गुन्हयातील तिन आरोपी पैकी एक आरोपी तिरुमलशेट्टी वेंकटेश्वर राव वय 60 हे सध्या न्यायालयीन कोठडी मध्ये आहे. बाकी दोन आरोपी यांना अदयापही अटक केलेली नाही. या गुन्हयाचा तपास इओडब्ल्यु कडील पीएसआय प्रमोद चिंतामणी हे करीत आहे. दि. 11/10/2025 रोजी मी सदर केसबाबत इओडब्ल्यु पिंपरी चिंचवड आयुक्तालय या कार्यालयात चौकशी अधिकारी पीएसआय प्रमोद चिंतामणी यांना से बाबत विचारणा करीता भेटण्यास गेलो होतो. त्यावेळी ते मला वरिष्ठ अधिकारी पीआय संदिप सावंत यांचे केबीनमध्ये घेऊन गेले. त्यावेळी पीआय सावंत यांनी माझेशी अत्यंत अरेरावीची भाषा केली. त्यानंतर पिएसआय प्रमोद चिंतामणी यांनी देखील अरेरावीची भाषा केली. मी त्यांना माझे अशील तिरुमलशेट्टी वेंकटेश्वर राव यांच्या से बाबत विचारणा केली असता, पिएसआय प्रमोद चिंतामणी यांनी पीआय संदीप सावंत यांचेसमोर से देण्यासाठी 2,00,000/- रु. लाच म्हणून मागीतली. ही बाब मी माझे आशिल राघव तिरुमलशेटटी यांना सांगीतली त्यावर राघव तिरुपतशेटटी यांनी मला सदरबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेकडे तक्रार देण्यास सांगीतली. त्याबाबतचे त्यांनी मला अधिकारपत्र दिलेले आहे. म्हणुन मी आज रोजी तक्रार देण्यासाठी ला.प्र.



Scanned with CamScanner

वि. कार्यालयात आलो आहे. तरी माझे अशील तिरुमलशेट्टी वेंकटेश्वर राव वय 60 यांचा अटके दरम्यानचा से देण्यासाठी इओडब्ल्यु कडील पीएसआय प्रमोद चिंतामणी यांनी त्यांचे वरिष्ठ पीआय संदीप सावंत यांचे समक्ष 2,00,000/- रुपये लाचेची मागणी केली म्हणुन माझी पीएसआय प्रमोद चिंतामणी व पीआय संदीप सावंत यांच्या विरुध्द तक्रार आहे. पिएसआय प्रमोद चिंतामणी हे सध्या त्यांचे मुळ गावी रजेवर गेलेले आहेत. ते रजेवरुन हजर झाल्यानंतर त्यांच्यावर व पोनि संदीप सावंत यांच्यावर कार्यवाही होणे आवश्यक आहे. माझे पिएसआय चिंतामणी व पोनि सावत यांचेसोबत कोणतेही आर्थीक वादविवाद नाहीत." अशी तक्रार कथन केली. त्यानंतर 18.20 वा पंच लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर झालेनंतर आम्ही तक्रारदार लोखंडे यांनी त्यांचे हस्ताक्षरात लिहुन दिलेली तक्रार दोन्ही पंचांना दाखवीली सदर तक्रार वाचुन तक्रारीवर आम्ही, पंच क्रं 1 म्हणुन श्री. बालाजी विठ्ठल मोरे व पंच क्रं 2 म्हणुन श्री. निलेश प्रकाश वाघले म्हणुन सहया केल्या. त्यानंतर तक्रारदार यांनी पोउनि प्रमोद चिंतामणी हे दोन दिवसाकरीता त्यांचे मुळ गावी गेले असल्याने त्यांनी माझेसोबत संपर्क केला की, आपण पुढील कारवाई करु असे सांगीतले. तक्रारदार यांना पोउनि प्रमोद चिंतामणी यांनी संपर्क केल्यानंतर आम्ही आपणास बोलावु त्यावेळी आपण तात्काळ हजर राहण्याची सुचना देऊन नमुद तक्रारीबाबत गोपनियता राखणेबाबत सुचना देवुन जाण्यास सांगीतले. दिनांक 16/10/2025 रोजीपर्यंत पोउनि चिंतामणी यांनी तक्रारदार यांचेसोबत संपर्क न केल्याने आम्ही तक्रारदार यांना लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना दिली होती. आमचे सुचनेनुसार तक्रारदार हे दि. 16/10/2025 रोजी लाप्रवि, पुणे कार्यालयात 17.30 वा चे सुमारास हजर झाले. आम्ही श्री.दयानंद गावडे यांचेकडे सापळा पथकाची मागणी केली असता त्यांनी पोशि भुषण ठाकुर यांना सापळा पथकात दिले. त्यावेळी दोन्ही पंच लाप्रवि कार्यालयात हजर होते, त्यांची व सापळा पथकाची व पंचांची आम्ही तक्रारदार लोखंडे यांचेसोबत ओळख करुन दिली. पोउनि प्रमोद चिंतामणी यांनी तक्रारदार यांना संपर्क न केल्याने पंचासमक्ष पोउनि प्रमोद चिंतामणी हे फोनवर तक्रारदार यांचेसोबत चर्चा करतात अगर कसे? याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पोउनि प्रमोद चिंतामणी व माझे त्यांचेसोबत नियमीत व्हॉटसअॅप कॉल होत असतात, असे सांगीतल्याने पोउनि प्रमोद चिंतामणी यांचेकडे फोनवर पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष आमचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, एक पॅकबंद मायक्रो एस.डी.कार्ड समक्ष हजर केले. पंचांनी सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डरची पाहणी केली असता तो सोनी कंपनीचा असल्याचे दिसत आहे. त्यानंतर आम्ही व्हॉइस रेकॉर्डरबाबत माहिती देवून मायक्रो एस.डी.कार्डचे सिलबंद पॅकिंग उघडुन पंचांना दाखविले असता ते सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी.कार्ड असल्याचे दिसून आले. सदरचे मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत नसल्याची आम्ही पंचाची व तक्रारदार यांची खात्री करुन दिली व त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्री प्रसन्ना गोविंद लोखंडे यांनी त्यांचे निवेदन व त्यानंतर अनुक्रमे पंच क्रं 1 म्हणुन श्री. बालाजी विठ्ठल मोरे व पंच क्रं 2 म्हणुन श्री. निलेश प्रकाश वाघले यांचे पडताळणी कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 17.57 वा. ध्वनीमुद्रीत केले व व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना फोनवर करण्यात येणाऱ्या पडताळणी कारवाईच्या अनुशंगाने सुचना दिल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 8657614438 यावरुन पोउनि प्रमोद चिंतामणी यांचा मो.क्रं. 7620166506 यावर व्हॉटसअॅप कॉल करुन त्यांचे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. त्याचवेळी आम्ही आमचेकडील व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे मोबाईल फोनसमोर धरला. परंतु पोउनि प्रमोद चिंतामणी यांनी फोन रिसीव्ह केला नाही. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. ती वेळी 18.14 वा ची होती. त्यावेळी तक्रारदार यांनी पंचासमक्ष त्यांचेकडे पोउनि प्रमोद चिंतामणी यांचा दुसरा मो.क्रं. असुन त्यावर फोन करतो असे सांगीतले. आमचे सुचनेनुसार तक्रारदार लोखंडे यांनी त्यांचा मो.क्रं. 8657614438 यावरुन पोउनि प्रमोद चिंतामणी यांचा दुसरा मो.क्रं. 7385560511 यावर व्हॉटसअॅप कॉल करुन त्यांचे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी आम्ही व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे मोबाईल फोनसमोर धरला. परंतु पोउनि प्रमोद चिंतामणी यांनी फोन रिसीव्ह केला नाही. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. ती वेळी 18.16 वा ची होती. एकंदरीत तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुशंगाने पोउनि प्रमोद चिंतामणी यांचेकडे पंचासमक्ष फोनवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये पोउनि प्रमोद चिंतामणी यांनी फोन रिसीव्ह न केल्याने त्यांचेकडे पडताळणी कारवाई करता आलेली नाही. त्यानंतर नमुद झाले कारवाईवरुन आम्ही तक्रारदार यांना पोउनि प्रमोद चिंतामणी यांनी संपर्क केल्यानंतर त्यांचेकडुन वेळ मागुन घेऊन तात्काळ आमचेसोबत संपर्क साधणेबाबत सांगीतले. तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुशंगाने पडताळणी कारवाई दरम्यान वापरण्यात आलेले मेमरीकार्ड त्याचे मुळ वेष्टनात टाकुन पंचासमक्ष सिलबंद करण्यात आले. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. तक्रारदार यांचे अशील तुरुमलशेट्टी वेंकटेश्वर राव यांचे जामीन अर्जावर दि. 17/10/2025 रोजी मा. प्रथम वर्ग न्यायालयात, पौड, येथे सुनावणी असल्याने तक्रारदार हे पौड कोर्टमध्ये गेले होते तेथे सुनवाणी होवुन मा. न्यायालयने सदर जामीन अर्जावर दि. 29/10/2025 रोजी सुनावणी घेणार



Scanned with CamScanner

असल्याने पुढील पडताळणी कारवाई हि दिवाळीची सुट्टी संपल्यानंतर दि. 27/10/2025 रोजी करणेबाबत तक्रारदार यांनी आम्हास कळवीले. त्याप्रमाणे आम्ही पंचांना दि. 27/10/2025 रोजी सकाळी 11.00 वा. लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना दिली होती. दि. 27/10/2025 रोजी आम्ही तक्रारदार यांना फोनवरुन संपर्क साधुन कारवाईबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पोउनि प्रमोद चिंतामणी हे त्यांचे कार्यालयात हजर असल्याची मी आत्ताच माहीती घेतली असुन आपण दुपारी 15.00 वा चे सुमारास वल्लभनगर येथील सेल पेट्रोलपंपासमोरील सार्वजनीक रोडच्या बाजुला भेटु असे सांगीतले. त्यानंतर नमुद कारवाईच्या अनुशंगाने श्री. दयानंद गावडे, पोलीस उप अधीक्षक, प्रशासन, लाप्रवि, पुणे यांनी मदतीसाठी पोकॉ ठाकूर ब.क्र.7364, पोकॉ 95 दिवेकर, तसेच शासकीय वाहन टियुव्ही क्रं एमएच-12-आरवाय-7271 त्यावरील चालक सहा. पोलीस फौजदार अविनाश चव्हाण असे कर्मचारी सापळा पथकामध्ये दिले. त्यानंतर सुमारे 14.10 वा चे सुमारास आम्ही, पंच व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथुन आम्ही सर्वजण सपोफौ चव्हाण यांचे ताब्यातील शासकीय वाहन टियुव्ही क्रं एमएच-12-आरवाय-7271 याने पडताळणी व सापळा कारवाईसाठी आवश्यक असणारे लॅपटॉप प्रिन्टर, काळा कपडा, लाखी पितळी सिल, अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिवा, व्हॉईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड व इतर स्टेशनरी साहित्य घेवून अँन्टी करप्शन ब्युरो पुणे कार्यालय येथून रवाना होवुन साधु वासवाणी चौक - आरटीओ चौक - वाकडेवाडी – खडकीमार्गे येथील पिंपरी वल्लभनगर येथील सेल पेट्रोलपंपासमोरील सार्वजनीक रोडवर 14.40 वा. चे सुमारास पोहोचलो. त्यावेळी तक्रारदार लोखंडे हे त्यांचेकडील दुचाकी अॅक्टीव्हा वाहन क्रं एमएच 14 एवाय 8348 यावरुन सदर ठिकाणी हजर होते. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसण्याचा इशारा केला असता, तक्रारदार हे शासकीय वाहनात येऊन बसले. त्यानंतर कोणासही संशय येऊ नये म्हणुन पुढील कारवाई सदर ठिकाणाहुनच करणेबाबत ठरविण्यात आले. आम्ही पुन्हा तक्रारदार, पंच व पथकाची एकमेकांसोबत ओळख करुन देऊन तक्रारदार यांनी दि.13/10/2025 रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने आजपर्यंत झालेल्या कारवाईबाबत सर्वांना थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष दि. 16/10/2025 रोजी फोनवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान वापरण्यात आलेले मेमरीकार्ड सलग वापरण्याबाबत ठरविण्यात आले व दि. 16/10/2025 रोजी पडताळणी कारवाईनंतर लिफाफयामध्ये सिलबंद करुन त्यांचे ताब्यात सुरक्षीतरित्या ठेवलेले मेमरीकार्ड पंचांना दाखविले. सदरच्या मेमरीकार्डचा लिफाफा सिलबंद असल्याबाबत पंचांनी खात्री केली. त्यानंतर सदर लिफाफयामधुन मेमरीकार्ड बाहेर काढुन पंचांना दाखवीले. दि. 16/10/2025 रोजीच्या कारवाई दरम्यान वापरण्यात आलेले मेमरीकार्ड हेच असल्याची पंचांची खात्री केली. त्यानंतर सदर मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यामध्ये दि. 16/10/2025 रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यानच्या एकुण 03 फाईल असल्याची आम्ही पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर प्रथम तक्रारदार श्री प्रसन्ना लोखंडे व पंच क्र. 1 म्हणून श्री. बालाजी विठ्ठल मोरे व पंच क्र.2 म्हणून श्री. निलेश प्रकाश वाघले यांचे पडताळणी कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 14.50 वा. ध्वनीमुद्रीत केले व व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. आम्ही तक्रारदार व पंच क्रं 01 यांना पडताळणीबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही 15.07 वा. व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, तो होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री लोखंडे यांचे शर्टाचे आतील बाजुस बनियनला कोणसही संशय येणार नाही अशा पध्दतीने सेफ्टी पिनचे मदतीने लावला व तक्रारदार यांना त्यांचेकडील दुचाकी वाहन एमएच 14 एवाय 8348 यावरुन पंच क्र.1 श्री मोरे यांचे सोबत लोकसेवक चिंतामणी यांना भेटण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामधील अथिंक गुन्हे शाखा येथे रवाना केले व पंच क्रं 2, सापळा पथक, सदर ठिकाणी थांबून राहीलो. ती वेळ 15.07 वा. होती.काही वेळाने तक्रारदार व पंच क्रमांक 01 हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला. ती वेळ 16.05 वा.ची होती. आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार श्री लोखंडे यांना पडताळणी कारवाई कामी पाठविलेपासून परत येईपर्यंतची हकिकत विचारले असता त्यांनी सांगितले की, " मी व पंच क्र.1 श्री मोरे असे माझेकडील नमूद दुचाकी वाहनाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयाच्या आवारात पोहचून मी माझे वाहन पार्क केले व आम्ही दोघेजण पोलीस आयुक्तालय कार्यालयामध्ये गेलो. सुरुवातील प्रवेशव्दारात आमचेकडे तेथे उपस्थित असलेल्या पोलीस कर्मचारी यांनी आम्हास आमचे नाव विचारुन कोणाकडे जायचे आहे, याबाबत विचारणा केली. तशी आमची नोंद करुन घेतल्यानंतर आम्ही सदर ठिकाणाहुन निघुन पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचे कक्षाकडे गेलो. सदर ठिकाणी पोलीस उप निरीक्षक चिंतामणी उपस्थित नसल्याने आम्ही त्यांचेबाबत तेथील कर्मचारी यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी आम्हास चिंतामणी साहेब कोर्टात गेले असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी व पंच क्रं 1 असे तेथील मोकळया पोर्चमध्ये आलो. त्यावेळी मी माझा मो.क्रं. 865761438 यावरुन पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचा मो.क्रं. 7620166506 यावर व्हॉटसअॅप कॉल करुन माझे मोबाईलचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांनी माझा कॉल रिसीव केला. त्यावेळी मी त्यांना "चिंतामणी साहेब, नमस्कार" असे बोललो.



Scanned with CamScanner

त्यावर ते मला "नमस्ते, बोला ना" असे म्हणाले असता मी त्यांना "आलो होतो, इथ, सीपी ऑफिसला, किती वेळ लागेल तुम्हाला, कधी भेट होईल" असे बोललो. त्यावर चिंतामणी साहेब मला "एक-दिड तास" असे म्हणाले. त्यानंतर चिंतामणी साहेब यांनी माझे अशीलाविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयासंदर्भात व जामीन अर्जावर पुढील तारीख घेण्याबाबत माझ्यासोबत चर्चा करीत असताना चिंतमाणी साहेबांनी मला "मी येतो, तुम्हाला भेटतो, कुठ भेटायच" अशी विचारणा केली. त्यावर मी त्यांना "आपल्या इथच भेटु, चाफेकर" असे बोललो. त्यावर चिंतामणी साहेब मला "आल्यावर फोन करतो" असे म्हणाले. त्यानंतर आमचेमध्ये चर्चा होवुन त्यांनी फोन कट केला. आमचेमधील झालेले सर्व संभाषण पंच क्रं 1 मोरे यांचेसमक्ष झाले आहे. त्यानंतर मी व पंच क्रं 1 असे पोलीस निरीक्षक सावंत यांना भेटण्यासाठी त्यांचे केबीनजवळ गेलो. त्यावेळी तेथील एका कर्मचारी याने मला "तुम्हाला साहेबांना भेटायच आहे का" अशी विचारणा केली. त्यावर मी त्यांना "हो, भेटायच आहे" असे म्हणालो. त्यानंतर मी व पंच क्रं 1 मोरे असे पोलीस निरीक्षक सावंत यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी त्यांचे केबीनमध्ये इतर दोन इसम उपस्थित होते. त्यावेळी पोलीस निरीक्षक सावंत हे मला "लोखंडे साहेब काय म्हणताय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "सहज आलतो, म्हणल चिंतामणी सरांना भेटुन जाव." असे म्हणालो. त्यावेळी ते मला " कोर्टात गेलाय तो" असे म्हणाले. त्यानंतर पोलीस निरीक्षक सावंत मला " काय म्हणता, तुमचा आशील आमच्याविरुध्द हयुमन राईट करतो" असे म्हणुन पंचांकडे हाताने इशारा करत "हे कोण" अशी विचारणा केली. त्यावर मी त्यांना "वकिल आहेत मोरे" असे म्हणालो. त्यानंतर माझ्या अशीलाच्या जामीनअर्जावर आमचेमध्ये चर्चा झाली. त्यानंतर मी व पंच क्रं 1 मोरे पोलीस निरीक्षक सावंत यांचे केबीनमध्ये निघुन बाहेर आलो. त्यानंतर पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयाच्या पार्कींगमधुन वाहन घेऊन व पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन आपण थांबले त्या ठिकाणी परत आलो. अशी हकिकत पंच क्रं 2 यांचेसमक्ष सांगीतली.एकंदरीत तक्रारदार श्री प्रसन्ना लोखंडे यांचे तक्रारीच्या अनुशंगाने करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईच्या अनुशंगाने पोलीस उप निरीक्षक चिंतामणी हे कोर्टात गेले असल्याने व त्यांनी आले नंतर फोन करतो, त्यावेळी भेटु असे फोनवर सांगीतल्याने पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचा फोन आले नंतर पुढील कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही, पंच, संपुर्ण पथक व तक्रारदार कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सदर ठिकाणी थांबुन राहिलो. पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचा फोन न आलेने त्यांना फोन करुन भेटणार आहेत अगर कसे? याबाबत विचारणा करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 865761438 यावरुन पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचा मो.क्रं. 7620166506 यावर व्हॉटसअॅप कॉल करुन मोबाईलचा स्पिकर ऑन केला त्यावेळी आम्ही व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्डीग सुरु केले. ती वेळ 17.43 वा. ची होती. त्यावेळी तक्रारदार हे चिंतामणी साहेब यांना "साहेब नमस्कार, काहि नाही वाट बघत होतो, म्हणुन फोन केलाय" असे म्हणाले. त्यावर चिंतामणी साहेब हे तक्रारदार यांना "येतो येतो एक पंधरा-विस मिनीटात येतो" असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा काहिवेळ चर्चा झालेनंतर फोन कट केला. त्यावेळी आम्ही आमचे कडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. ती वेळ 17.44 वा ची होती. बराचवेळ पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचा फोन कॉल आला नाही म्हणुन तक्रारदार यांनी आम्हास पोलीस उप निरीक्षक चिंतामणी हे इतका वेळ कार्यालयात थांबत नाहीत ते 18.00 वा नंतर निघुन जातात असे सांगुन आपण पुढील कारवाई उदया करु अशी विनंती केली. त्यानंतरही फोनची वाट पहात सुमारे 18.30 वा. पर्यंत सर्व पथक, पंच व तक्रारदार सदर ठिकाणी थांबुन राहिले परंतु पोउनि यांचा फोन न आल्याने पुढील कारवाई उदया दि. 28/10/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार यांना आम्ही गोपनियतेबाबत सुचना देऊन पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचा फोन कॉल आलेनंतर तात्काळ आमचेशी संपर्क साधण्याबाबत सुचना दिली व त्यानंतर तक्रारदार हे त्यांचे दुचाकीने सदर ठिकाणाहुन निघुन गेले व आम्ही, पंच व पथक सदर ठिकाणाहुन निघुन शासकीय वाहनाने लाप्रवि, पुणे कार्यालयाकडे निघालो. सुमारे 19.20 वाजेच्या आरटीओ चौक पुणे येथे आलो असताना, तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन आम्हाला फोन करुन पोलीस उप निरीक्षक चिंतामणी हे भेटण्यास बोलवत असल्याचे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांना त्यांचेकडे काहीवेळ मागुन घेणेबाबत सांगुन आकुर्डी चौकाच्या अलीकडे मुख्य रस्त्यालगत भेटु असे सांगीतले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन शासकीय वाहनावरील चालक सपोफौ चव्हाण यांनी आरटीओ चौकातुन यु टुर्न घेऊन शासकीय वाहन आकुर्डी चौकाच्या दिशेने घेतले. आकुर्डी चौकाच्या अलीकडे असलेल्या शुभ सोसायटीसमोरील मोकळया जागेत आम्ही, संपुर्ण पथक व पंच शासकीय वाहनाने पोहोचलो ती वेळ 20.05 वा ची होती. सदर ठिकाणी तक्रारदार हे आमचे आगोदरपासुनच उपस्थित होते. त्यावेळी पोउनि चिंतामणी हे साई कॅफे हॉटेलमजवळ थांबलेले असुन मला त्यांनी लगेच बोलावले आहे असे तक्रारदार यांनी सांगीतले.आम्ही तक्रारदार व पंच क्रं 1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान दिलेल्या सुचनांची थोडक्यात उजळणी करुन दिली व 20.13 वा. व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, तो होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री लोखंडे यांचे शर्टचे आतील बाजुस बनियनला कोणसही संशय येणार नाही अशा पध्दतीने सेफ्टी पिनचे मदतीने लावला व तक्रारदार यांना त्यांचेकडील दुचाकी



Scanned with CamScanner

वाहन एमएच 14 एवाय 8348 यावरुन पंच क्र.1 श्री मोरे यांचे सोबत लोकसेवक चिंतामणी यांना भेटण्यासाठी त्यांनी बोलाविले ठिकाणी रवाना केले व पंच क्र 2, सापळा पथक, यांचेसह शुभ सोसायटीसमोरील मोकळ्या जागेत थांबून राहीलो. काहिवेळात तक्रारदार व पंच क्र 1 पथक थांबले त्याठिकाणी परत आले त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. ती वेळ 20.58 वा. ची होती.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री लोखंडे यांना पडताळणी कारवाई कामी पाठविलेपासून परत येईपर्यंतची हकिकत विचारले असता त्यांनी सांगितले की, "मी पंच क्रं 1 मोरे यांना सोबत घेऊन आकुर्डी चौक येथे गेलो. सदर ठिकाणी मला पोलीस उप निरीक्षक चिंतामणी हे दिसुन न आलेने मी त्यांना माझे मोबाईलवरुन फोन करुन स्पिकर ऑन केला. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांनी फोन रिसीव्ह केला. त्यावेळी मी त्यांना "साहेब कुठ आहेत" याबाबत विचारणा केली करुन त्यांचे लोकेशन पाठविणेबाबत विनंती केली असता, पोलीस उपनिरीक्षक चिंतामणी यांनी मला माझे व्हॉटसअँप वर त्यांचे लोकेशन पाठविले त्यावेळी मी व पंच क्रं 1 मोरे त्या लोकेशनवर गेलो. त्यावेळी रोडच्या कडेला असलेल्या साई कँफेच्या कंपाउंडमध्ये आम्ही गेलो. सदर ठिकाणी एक इसम उपस्थित होते. त्यावेळी मी त्या इसमाकडे इशारा करत पंच क्रं 1 मोरे यांना हेच पोलीस उप निरीक्षक चिंतामणी असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी व पंच क्रं 1 त्यांचेजवळ गेलो असता, पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांनी पंचांकडे इशारा करत त्यांचेबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना "वकिल आहेत आपले" त्यावर ते मला "थांबवा लांब त्यांना" असे म्हणाले. त्यानंतर पंच मोरे हे सदर ठिकाणी थांबुन राहिले. मी व पोलीस उप निरीक्षक चिंतामणी हे 3-4 पावले पुढे जावुन थांबलो. त्यावेळी आमचेमध्ये माझ्या अशिलाच्या जामीन अर्जाबाबत चर्चा केली. तसेच त्यांनी माझ्या अशीलाने मानवी हक्क आयोगाकडे केलेल्या अर्जाबाबत विचारणा केली. त्यानंतर आमचेमध्ये बराच वेळ कामासंदर्भात चर्चा केली. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांनी मला जामीन अर्जावर पुढील तारीख घेणेबाबत सांगीतले. त्यानंतर पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांनी मला माझ्या अशीलास मानवी हक्क आयोगाचे प्रकरण मिटविण्याबाबत सांगीतले. आमचेमध्ये सर्व कामासंदर्भात चर्चा होत असतानाच पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांनी मला माझी वकीलीची फी विचारली असता मी तिन कोटी इतकी रक्कम सांगीतली यावर पोउनि चिंतामणी हे मला " तुम्हाला तिन कोटी देणार, मग आम्हाला किती " असे म्हणाले. त्यावर
"पोउनि चिंतामणी हे म्हणाले की, मग साहेबांना एक आण मला एक दे ना दोन कर म्हणाव संपला विषय" त्यावर मी "दोन कोटी" असे म्हणालो. त्यानंतर मी चिंतामणी यांना "किती सांगु सांगा, मी त्याला" असे बोलत असताना, पोलीस उप निरीक्षक चिंतामणी मला "देणार करसे, अकौंटला नाही घेणार, अकौंटला कसे पैसे घेऊ सर आम्ही, हवाला दे ना" असे बोलले. त्यावर मी त्यांना "हवाला, चालतय" असे बोललो. त्यानंतर पोउनि चिंतामणी यांनी मला माझे मोबाईलवरुन माझे आशिल राघव यांना व्हॉटसअप कॉल करण्यास सांगीतले. म्हणुन मी माझे मोबाईल क्रं 8657614438 यावरुन माझे आशिल राघव यांचा मोबाईल क्रं 7670868070 यांना व्हॉटसअप कॉल केला माझ्या अशीलास 3 ते 4 वेळा फोन लावला परंतु आमचा आवाज त्यांना जात नसल्याने आमचेमध्ये संभाषण होवु शकले नाही. त्यानंतर माझे आशिल यांना फोन लागला तो फोन मी स्पिकरवर टाकला व मी माझे आशिल यांना " उनका एक करना है वन सिआर उनको और उनके मतलब सावंत साब को वन सीआर" असे बोललो यावर राघव हे "ओके सर" असे बोलेले. त्यांनतर पोउनि चिंतामणी हे माझे आशिला यांना "ओके ओके ठिक है, हँलो लाटकर का भी क्लिअर हो जायेगा ना 29 को" यावर राघव हे "बोल दिया ना सर आपको कैसे करेंगे बोलके" यानंतर राघव यांनी फोन बंद केला. त्यावेळी चिंतामणी साहेब मला "साहेबांना हा विषय बोलु नका" असे म्हणाले. त्यानंतर आमचेमध्ये पुन्हा माझ्या अशीलाविरुध्द दाखल असलेल्या गुन्ह्याबाबत चर्चा झाली. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक चिंतामणी हे मला "तुम्ही दिलेल्या रकमेत आम्ही आमच बघुन घेऊ, सीपी, डिसीपी मँनेज करु" असे म्हणाले. त्यानंतर पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांनी मला पुन्हा माझ्या अशीलास फोन लावणेबाबत सांगीतल्याने मी माझ्या मोबाईलवरुन माझ्या अशीलास फोन लावुन दिला. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक चिंतामणी हे माझे अशीलास माझे फोनवरुन बोलले. त्यानंतर मला पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांनी मागणी केलेप्रमाणे दोन कोटीची लाच रक्कम हि मी पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचे समक्ष माझे अशीलास सांगीतली. त्यानंतर आमचेमध्ये पुन्हा चर्चा होत असताना, पोलीस उप निरीक्षक चिंतामणी हे मला "त्याला उदया दोन कोटी पोहोचवायला लावा" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "उदया जरा डाऊट आहे" असे म्हणालो. त्यानंतर पुन्हा आमचेमध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांनी पुन्हा मला माझे अशीलास फोन लावणेबाबत सांगीतल्याने मी माझ्या अशीलास फोन लावुन मोबाईलचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक चिंतामणी व माझे अशीलामध्ये दाखल गुन्हयाचे अनुशंगाने पुन्हा चर्चा झाली. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांनी माझे मोबाईलवरुन माझे अशीलासोबत लाचेसंदर्भात चर्चा केली. त्यानंतर पोलीस उप निरीक्षक चिंतामणी हे मला "हवाला कर उदया" असे म्हणाले. तेंव्हा मी त्यांना "किती" अशी विचारणा केली असता, ते मला "दोन कोटी" असे म्हणाले. आमचे सर्व



Scanned with CamScanner

संभाषण हे पंच क्रं 1 मोरे हे थोडया अंतरावर थांबुन ऐकत होते. त्यानंतर पुन्हा आमचेमध्ये चर्चा झाल्यानंतर मी व पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन आपण थांबले त्याठिकाणी परत आलो. अशी हकिकत पंच क्रं 2 यांचे समक्ष आम्हास सांगीतली. एकंदरीत तक्रारदार श्री प्रसन्ना लोखंडे यांचे तक्रारीच्या अनुशंगाने पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचेकडे समक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये पोलीस निरीक्षक चिंतामणी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे अशीलाविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयामध्ये जामीन अर्जावर से देणेकरीता तसेच गुन्हयात मदत करणेकरीता दोन कोटी रुपयांची लाचेची मागणी स्वत:करीता व पोलीस निरीक्षक सावंत यांचेकरीता करीत असल्याचे निष्पन्न झाले व उदया 28/10/2025 रोजी पोलीस निरीक्षक संदीप सावंत यांचेकडे पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले. कोणाराही संशय येऊ नये म्हणुन झाले पडताळणी कारवाईचा पंचनामा लाप्रवि, पुणे कार्यालयात जावुन करण्याचे ठरविण्यात आले. तसेच तक्रारदार यांना गोपनियतेबाबत सुचना देऊन दि. 28/10/2025 रोजी सकाळी 10.00 वा. लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना देण्यात आली. त्यानंतर आम्ही, संपुर्ण पथक व पंच शासकीय वाहनाने सदर ठिकाणाहुन 22.15 वाजता निघुन लाप्रवि, पुणे कार्यालात 23.00 वा चे सुमारास पोहोचलो. याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.दिनांक 28/10/2025 रोजी तक्रारदार हे सकाळी 10.00 वाजता लाप्रवि कार्यालयात हजर झाले. त्यावेळी संपुर्ण सापळा पथक लाप्रवि कार्यालयात हजर होते. पोउनि चिंतामणी हे तक्रारदार यांना वारंवार व्हॉटसअँप कॉल करीत असल्याचे तक्रारदार यांनी आम्हाला सांगीतल्याने दिनांक 27/10/2025 रोजी पडताळणी कामी वापरण्यात आलेले मेमरी कार्ड सलग वापरण्यात आले त्यांनतर आमचे सुचनेवरुन पोउनि चिंतामणी यांना फोन करुन पडताळणी करीता पोलीस निरीक्षक संदीप सावंत यांची भेट घालुन देणेबाबत आग्रह करावा असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 8657614438 यावरुन पोउनि प्रमोद चिंतामणी यांचा मो.क्रं. 7620166506 यावर व्हॉटसअँप कॉल केला असता फोनवर झालेल्या संभाषणावरुन पोउनि चिंतामणी यांना तक्रारदार यांनी पहीला हप्ता म्हणुन 50 लाख रुपये देण्याचे सांगुन बाकीची रक्कम आमचे आशिल राघव हे टप्पाटप्प्याने करतील असे सांगीतले त्यावर पोउनि चिंतामणी यांनी होकार देवुन तक्रारदार यांचे मागणीनुसार लोकसेवक चिंतामणी यांनी पोलीस निरीक्षक सावंत व तक्रारदार यांची भेट करुन देणेबाबत संमती दाखविल्याने पोलीस निरीक्षक संदिप सावंत यांचेकडे त्यांचे कार्यालयात जावुन पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. सदरचे दोन कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आलेले आहे. पुढील कारवाई वल्लभनगर येथील शेल पेट्रोलपंपासमोर 16.00 वा. करण्याचे ठरविण्यात आले. नमुद कारवाईकामी वापरण्यात आलेल्या मेमरीकार्डमध्ये एकुण 11 फाईल झाल्याने पुढील कारवाईकरीता नवीन मेमरीकार्ड वापरण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर नमुद मेमरीकार्ड दोन्ही पंचांसमक्ष सदर व्हॉईस रेकॉर्डरमधून बाहेर काढून ते त्याचे पुर्वीच्या प्लॅस्टिक कव्हरमध्ये ठेवून सदरचा प्लॅस्टिक कव्हर एका पिस्ता रंगाचे पाकिटामध्ये ठेवून सदर पाकिटाचे तोंड बंद करुन, त्यावर मेमरी कार्डचे वर्णनाचे पंचाचे व आमचे सहीचे लेबल चिकटवून सदरचे पाकिट सिलबंद केले. त्यानंतर सुमारे 14.45 वा चे सुमारारा आम्ही, पंच व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथुन आम्ही सर्वजण सपोफौ चव्हाण यांचे ताब्यातील शासकीय वाहन टाटा सुमो क्रं एमएच-12-एनयु-5882 याने पडताळणी व सापळा कारवाईसाठी आवश्यक असणारे लॅपटॉप प्रिन्टर, काळा कपडा, लाखी पितळी सिल, अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिवा, व्हॉईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड व इतर स्टेशनरी साहित्य घेवून अँन्टी करप्शन ब्युरो पुणे कार्यालय येथून रवाना होवुन साधु वासवाणी चौक - आरटीओ चौक - वाकडेवाडी - खडकीमार्गे येथील पिंपरी वल्लभनगर येथील सेल पेट्रोलपंपासमोरील सार्वजनीक रोडवर 16.00 वा. चे सुमारास पोहोचलो. त्यानंतर सुमारे 16.20 वा चे सुमारास तक्रारदार लोखंडे हे त्यांचेकडील दुचाकी अँक्टीव्हा वाहन क्रं एमएच 14 एवाय 8348 यावरुन सदर ठिकाणी हजर झाले. कोणासही संशय येऊ नये म्हणुन पुढील कारवाई सदर ठिकाणाहुनच करणेबाबत ठरविण्यात आले. पुढील कारवाई करीता नविन मेमरी कार्ड पंचाना दाखवुन सदरचे मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत नसल्याची पंचाची व तक्रारदार यांची खात्री करुन दिली व त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्री प्रसन्ना गोविंद लोखंडे यांनी त्यांचे निवेदण व त्यानंतर पंच क्रं 1 म्हणुन श्री. बालाजी विठ्ठल मोरे व पंच क्रं 2 म्हणुन श्री. निलेश प्रकाश वाघले यांचे पडताळणी कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 16.29 वा. ध्वनीमुद्रीत केले व व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 मोरे यांना पडताळणीबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही 16.45 वा. व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, तो होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री लोखंडे यांचे शर्टाचे आतील बाजुस बनियनला कोणसही संशय येणार नाही अशा पध्दतीने सेफ्टी पिनचे मदतीने लावला व तक्रारदार यांना त्यांचेकडील दुचाकी वाहन एमएच 14 एवाय 8348 यावरुन पंच क्र.1 श्री मोरे यांचे सोबत पोउनि चिंतामणी व पोनि सावंत यांना भेटण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे रवाना केले व पंच क्रं 2, सापळा पथक, सदर ठिकाणी थांबून राहीलो. काही वेळाने तक्रारदार व पंच क्रमांक 01 हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर



Scanned with CamScanner

काढून बंद केला. ती वेळ 17.55 वा.ची होती. आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार श्री लोखंडे यांना पडताळणी कारवाई कामी पाठविलेपासून परत येईपर्यंतची हकिकत विचारले असता त्यांनी सांगितले की, "मी व पंच क्र.1 श्री मोरे असे माझेकडील नमूद दुचाकी वाहनाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयाच्या आवारात पोहचून मी माझे वाहन पार्क केले व आम्ही दोघेजण पोलीस आयुक्तालय कार्यालयामध्ये गेलो. सुरुवातील प्रवेशव्दारात आमचेकडे तेथे उपस्थित असलेल्या पोलीस कर्मचारी यांनी आम्हास आमचे नाव विचारुन कोणाकडे जायचे आहे याबाबत विचारणा केली. तशी आमची नोंद करुन घेतल्यानंतर आम्ही सदर ठिकाणाहुन निघुन पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचे कक्षाकडे गेलो. सदर ठिकाणी पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांची भेट घेऊन कामासंदर्भात चर्चा झाली व त्यानंतर पोउनि चिंतामणी हे मला पोनि सावंत यांचे केबीनजवळ घेऊन गेले. त्यावेळी चिंतामणी यांनी इशाऱ्याने पंच मोरे यांना बाहेर थांबण्यास सांगीतले. काहीवेळ मी व पोउनि चिंतामणी असे पोनि सावंत यांचे केबीनच्या बाहेर थांबुन राहिलो. त्यावेळी आमचेमध्ये कामासंदर्भात व लाच रकमेसंदर्भात चर्चा झाली. काहीवेळाने पोनि सावंत यांचे केबीनमधुन बेलचा आवाज आल्याने मी व पोउनि चिंतामणी पोनि सावंत यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी मी पोनि सावंत यांचेसोबत माझ्या अशीलाच्या कामासंदर्भात चर्चा करीत असताना पोनि सावंत यांनी पोउनि चिंतामणी यांना "अजीबात पटत नाही, शहाणा असशील तर आरोपी अटक कर, विश्वास नाही" असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना "मी जबाबदारी घेतो" असे बोललो. त्यावर पोनि सावंत मला "फिर्यादीचे पैसे मिळत असतील तर ठिक आहे, किती दिवसात पाठवताय सांगा" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "तिन – चार दिवस" असे म्हणालो. त्यानंतर आमच्यामध्ये माझ्या अशीलाच्या जामीन अर्जावरील सुनावणीबाबत चर्चा झाली. त्यावेळी पोउनि चिंतामणी हे पोनि सावंत यांचेसमक्ष गुन्हयाबाबत चर्चा करीत असताना मी पोनि सावंत यांना "आपण म्हणल्याप्रमाणे मी त्यांना 1 सी. आर. च बोललो, कि एक कराच तुम्ही" असे म्हणालो. त्यावर पोनि सावंत मला "म्हटल्याप्रमाणेचा प्रश्नच नाही, त्याच्यावरती काही विश्वास नाही" असे बोलले. त्यानंतर पुन्हा आमच्यामध्ये बराच वेळ कामासंदर्भात चर्चा झाली. परंतु त्यामध्ये पोनि सावंत यांनी लाचेसंदर्भात काहीएक चर्चा न करता "कायदेशिर कारवाई करा" असे पोउनि चिंतामणी यांना सांगीतले. त्यानंतर मी पोनि सावंत यांचे केबीनच्या बाहेर आलो. तेथे थांबलेले पंच क्रं 1 मोरे यांना सोबत घेऊन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयाच्या पार्कीगमधुन वाहन घेऊन व पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन आपण थांबले त्या ठिकाणी परत आलो. पंच क्रं 1 यांनी हकीकत विचारली असता त्यांनी तक्रारदार यांचेशी मिळती हकीकत पंच क्रं 2 यांचे समक्ष सांगीतली. एकंदरीत तक्रारदार श्री प्रसन्ना लोखंडे यांचे तक्रारीच्या अनुशंगाने पोलीस निरीक्षक सावंत यांचेकडे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक पोलीस निरीक्षक सावंत यांनी तक्रारदार यांचेकडे कोणत्याही प्रकारे लाचेची मागणी केली नसल्याचे निष्पन्न झाले. कोणासही संशय येऊ नये म्हणुन झाले पडताळणी कारवाईचा पंचनामा लाप्रवि, पुणे कार्यालयात जावुन करण्याचे ठरविण्यात आले. तसेच तक्रारदार यांना शासकीय वाहनात सोबत घेऊन संपुर्ण पथक सदर ठिकाणाहुन 18.30 वा निघुन 19.20 वा. लाप्रवि, पुणे कार्यालयात पोहोचलो. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक पोउनि चिंतामणी यांचे 3-4 वेळा व्हॉटसअँप कॉल आला असल्याचे सांगीतले. त्यावेळी आमचे सुचनेनुसार तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 8657614438 यावरुन पोउनि प्रमोद चिंतामणी यांचा मो.क्रं. 7620166506 यावर व्हॉटसअँप कॉल करुन त्यांचे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला व व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे मोबाईल फोनसमोर धरला. ती वेळ 19.31 वा ची होती. त्यावेळी पिएसआय प्रमोद चिंतामणी यांनी फोन रिसीव्ह करुन पुन्हा लाच रकमेसंदर्भात केली यावर तक्रारदार यांनी सावंत साहेब निगेटीव्ह बोलताय असे बोलेले यावर पोउनि चिंतामणी यांनी वरीष्ठ अधिकारी असेच बोलतात, मी साहेबांना सांगतो असे म्हणुन पुन्हा लाचेची रक्कम देणेकरीता उदयुक्त केले त्यानंतर तक्रारदार यांचे अशीलाच्या कामासंदर्भात चर्चा केली. त्यानंतर पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांनी फोन कट केला व व्हॉईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ 19.41 वा. ची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंचांसमक्ष तक्रारदार यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगीतले की "मी 3-4 दिवसांत लाच रकमेची व्यवस्था करुन आपणास संपर्क करतो" असे सांगीतल्याने तक्रारदार यांनी लाच रकमेची व्यवस्था केलेनंतर पुढील कारवाई करणेबाबत ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी दि. 01/11/2025 रोजी आम्हाला सायंकाळी फोनवर संपर्क साधुन लाच रकमेची व्यवस्था झाली असुन आपण सापळा कारवाई उदया दि. 02/11/2025 रोजी करु असे कळवीले. त्याचप्रमाणे आम्ही श्री दयानंद गावडे, पोलीस उप अधीक्षक, (प्रशासन), लाप्रवि, पुणे यांना कळवुन सापळा पथकाची मागणी केली असता, त्यांनी पथक म्हणुन पोलीस निरीक्षक अविनाश घरबुडे, पोशि 7364 भुषण ठाकुर, पोशि 95 रवि दिवेकर, पोशि 1966 प्रविण तावरे, पोशि 2845 विकास आडके व शासकीय वाहन इर्टिगा क्रं एमएच 12 युसी 4109 व त्यावरील चालक सहा.पोलीस फौजदार अविनाश चव्हाण असे दिले. नमुद पथकास व पंचाना आम्ही फोन करुन आज दि. 02/11/2025 रोजी सकाळी 09.00 वा. लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना दिली होती.आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे आम्ही पंच व संपुर्ण पथक आज दि. 02/11/2025 रोजी सकाळी 09.00 वा.



Scanned with CamScanner

लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर झाले. आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे संपुर्ण पथक व आम्ही पंच लाप्रवि, पुणे कार्यालयात थांबुन राहिलो. त्यानंतर 11.30 वा. चे सुमारास तक्रारदार हे लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर झाले. आम्ही तक्रारदार, पंच व पथकात नव्याने सामील झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांची एकमेकांसोबत ओळख करुन दिली. त्यानंतर पंचांसमक्ष संपुर्ण पथकास तक्रारदार यांच्या दि. 13/10/2025 रोजी तक्रारीच्या अनुशंगाने आजपावेतो झालेल्या कारवाईबाबत सर्वांना थोडक्यात माहिती देऊन नमुद कारवाई वरुन आजरोजी सापळा कारवाई करण्यात येणार असलेबाबत सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी पंचासमक्ष सांगीतले की, "काल रात्री माझी व पोउपनि चिंतामणी यांची भेट झाली होती, त्यावेळी मी त्यांना माझे अशील राघव यांनी 45 लाख रुपये पाठविले आहेत व माझ्याकडील चिरीमीरी मध्ये 02 लाखा पैकी दिड लाख रुपये असे एकुण 46.50 लाख रुपये अॅडजस्ट झाले आहेत, पैसे घेण्यासाठी मी पुणे येथे जाणार आहे, माझे पैसे ताब्यात आले की, मी तुम्हाला कॉल करुन कळवीतो." असे सांगीतले आहे. त्यामुळे पुढील कारवाई हि लाचलुचपत प्रतिबंधक, पुणे कार्यालयामधुनच करणेबाबत ठरविण्यात आले. आम्ही तक्रारदार प्रसन्ना लोखंडे यांना पंचांसमक्ष लाचेच्या रक्कमेबाबत विचारले असता, त्यांनी त्यांचे बचतीमधुन मागीतलेल्या दोन लाख रुपये रकमेपैकी 1,50,000/- रुपये (भारतीय चलनातील रु.500/- दराच्या एकुण 300 नोटा) इतकी त्यांचे वैयक्तिक बचतीतुन आणली असल्याचे सांगितले. व उर्वरीत 45 लाख रुपये रक्कम ही 500/- रुपये दराच्या बनावट चलनी नोटा वापरण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. नमुद लाच रक्कम ही एका वर्तमान पत्रामध्ये गुंडाळण्यात आलेले असुन ते खाकी रंगाच्या चिकटपट्टीने पॅक करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार यांनी हजर केलेले उर्वरीत दिड लाख रुपये पिस्ता रंगाच्या पाकिटात ठेवण्यात आले. सदरचे लाच रकमेचे पाकिट व वर्तमान पत्रामध्ये गुंडाळलेली रक्कम हि एका पांढऱ्या रंगाच्या वारली पेंटींग असलेल्या पिशवीमध्ये ठेवुन ती पिशवी पोउनि चिंतामणी यांना देण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर पोशि प्रविण तावरे व पोशि विकास आडके यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या लाचेकामी वापरण्यात येणा-या रक्कमेच्या चलनी नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर पंच क्र.2 श्री वागले यांचे मदतीने लिहून घेवून त्यावर आम्ही व पंचांनी समक्ष म्हणून सहया केल्या.

त्यानंतर सपोफौ चव्हाण यांना सदर ऑफिसमध्ये बोलावून पंचांना व तक्रारदार लोखंडे यांना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्यांचे प्रात्यक्षिक करुन दाखविण्यास सांगितले. त्याप्रमाणे सपोफौ चव्हाण यांनी पंचांना व तक्रारदार लोखंडे यांना सापळा कारवाईचे साहित्यामधील एका पिवळया रंगाचे प्लॅस्टिकच्या डबीतील पांढऱ्या रंगाची पावडर दाखवुन ती अॅन्थ्रासीन पावडर असल्याचे व एक लहान दिवा (टॉर्च लाईट) दाखवुन तो अल्ट्राव्हॉयलेट दिवा असल्याचे सांगितले. तसेच अॅन्थ्रासिन पावडर ज्या वस्तूस किंवा व्यक्तीच्या शरीराच्या कोणत्याही भागावर लावल्यास ती साध्या प्रकाशात दिसून येत नसल्याचे सांगितले व तसे प्रात्यक्षिक करून दाखविले. मात्र पावडर लागलेली वस्तू अथवा व्यक्तीच्या शरीराचा भाग अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिल्यास त्यावर अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळया रंगाची चकाकी दिसुन येत असल्याचे सांगितले. सदर प्रात्यक्षिक सपोफौ चव्हाण यांनी करून दाखविले.त्यानंतर लाच रक्कम रक्कम रुपये 1,50,000/- (रूपये 500/- दराच्या 300 चलनी नोटा) व 45 लाख रुपयांच्या 500/- रुपये दराच्या बनावट चलनी नोटा, पिस्ता रंगाचे पाकिट, वर्तमानपत्र व नोटांचे गठ्ठे ठेवण्यात येणार आहे ती पांढऱ्या रंगाची त्यावर वारली पेंटींग असलेली पिशवी आम्हा पंचांना व तक्रारदार लोखंडे यांना प्रथम साध्या प्रकाशात व नंतर अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात दाखविल्या असता, सदर चलनी नोटांवर व त्या वस्तुंवर कुठेही अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळया रंगाची चकाकी दिसुन आली नाही. त्यानंतर आम्ही लाचेकामी वापरावयाची रक्कम रुपये 46,50,000/- रक्कम पांढऱ्या रंगाची त्यावर वारली पेंटींग असलेली पिशवी ही अॅन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता सपोफौ चव्हाण यांचेकडे दिली. सपोफौ चव्हाण यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना, पिस्ता रंगाच्या पाकिटास, नोटा गुंडाळलेल्या वर्तमानपत्रास, व सदरचे पाकिटे ज्या पिशवीमध्ये ठेवणार आहे त्या पिशवीस क्रमाक्रमाने कापसाच्या बोळयाने पिशविच्या बंधांना, संपुर्ण पिशवीच्या आजुबाजुला, अॅन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर सपोफौ चव्हाण यांनी पंचांना व तक्रारदार लोखंडे यांना सदर चलनी नोटा, पिस्ता रंगाचे पाकिट, नोटा गुंडाळलेल्या वर्तमानपत्रास, व सदरचे पाकिटे ज्या पिशवीमध्ये ठेवणार आहे ती पिशवी प्रथम साध्या प्रकाशात दाखविल्या असता, त्यावर अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली नाही. त्यानंतर आमचे कक्षामधील लाईट बंद करून कृत्रिम अंधार करून पोलीस निरीक्षक लोणारे यांनी अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाश पाडून सदर चलनी नोटा व सर्व वस्तु दाखविल्या असता, चलनी नोटा व पिशविच्या बंधाला व प्रत्येकी सर्व बाजूस अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळया रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पंचाना, तक्रारदार लोखंडे यांना पुढील सापळा कारवाई करीता दि. 28/10/2025 रोजी पडताळणी कारवाईदरम्यान वापरण्यात आलेले मेमरीकार्ड हेच पुढील सापळा कारवाईकरीता सलग वापरण्यात येणार असल्याचे सांगितले व 28/10/2025 रोजी पडताळणी कारवाईनंतर लिफाफयामध्ये सिलबंद करून त्यांचे ताब्यात सुरक्षीतरित्या ठेवलेले मेमरीकार्ड आम्हा पंचांना दाखविले. त्यानंतर आम्ही सदर मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यामध्ये दि.



Scanned with CamScanner

28/10/2025 रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यानच्या एकुण 03 फाईल असल्याची आम्हा पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर प्रथम तक्रारदार श्री प्रसन्ना गोविंद लोखंडे यांनी त्यांचे निवेदण व त्यानंतर पंच अनुक्रमे पंच क्रं 1 म्हणुन श्री. बालाजी विठ्ठल मोरे व पंच क्रं 2 म्हणुन श्री. निलेश प्रकाश वाघले यांचे सापळा कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 12.09 वा. ध्वनीमुद्रीत केले व व्हाँईस रेकॉर्डर बंद केला. तक्रारदार यांनी सांगीतल्याप्रमाणे पोलीस उप निरीक्षक हे लाच रक्कम स्विकारणेकरीता पुणे येथे कधी येणार आहेत अगर कसे याबाबत फोन करुन विचारणा करणेसाठी तक्रारदार यांना आम्ही सुचना दिली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 8657614438 यावरुन पिएसआय प्रमोद चिंतामणी यांचा मो.क्रं. 7620166506 यावर व्हाँटसअँप काँल करुन त्यांचे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. त्याचवेळी व्हाँईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे मोबाईल फोनसमोर धरला. परंतु पोउनि प्रमोद चिंतामणी यांनी फोन रिसीव्ह केला नाही ती वेळी 12.23 वा ची होती. आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे तक्रारदार लोखंडे यांनी त्यांचा मो.क्रं. 8657614438 यावरुन पिएसआय प्रमोद चिंतामणी यांचा मो.क्रं. 7620166506 व यावर रेग्युलर कॉल करुन त्यांचे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. त्याचवेळी व्हाँईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे मोबाईल फोनसमोर धरला. परंतु पिएसआय प्रमोद चिंतामणी यांचा फोन बंद असल्याने त्यांचेसोबत संपर्क होवु शकला नाही. त्यानंतर व्हाँईस रेकॉर्डर बंद केला. ती वेळी 12.26 वा ची होती. आम्ही पुन्हा तक्रारदार लोखंडे यांनी त्यांचा मो.क्रं. 8657614438 यावरुन पोउनि प्रमोद चिंतामणी यांचा दुसरा मो.क्रं. 7385560511 यावर रेग्युलर कॉल करुन त्यांचे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला व व्हाँईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे मोबाईल फोनसमोर धरला. परंतु पिएसआय प्रमोद चिंतामणी यांचा फोन बंद असल्याने त्यांचेसोबत संपर्क होवु शकला नाही. ती वेळी 12.27 वा ची होती. तक्रारदार लोखंडे यांनी त्यांचा मो.क्रं. 8657614438 यावरुन पिएसआय प्रमोद चिंतामणी यांचा मो.क्रं. 7620166506 यावर व्हाँटसअँप व रेग्युलर "कॉल मी अर्जट" असे मेसेज केले. ती वेळ 12.32 वा. ची होती. त्यानंतर काहिवेळ तक्रारदार यांचे फोन कॉलची वाट पाहणेबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचा मो क्रं 7620166506 यावरुन व्हाँटसअँप कॉल येत असलेबाबत सांगीतले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना फोन रिसीव्ह करणेबाबत सांगुन मोबाईन फोनचा स्पिकर ऑन करणेबाबत सुचना दिली व व्हाँईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे मोबाईल फोनसमोर धरला. त्यावेळी तक्रारदार हे पोउनि चिंतामणी यांना "हा सर, येताय ना पुण्यात, झालय काम" असे म्हणाले. त्यावर पोउनि चिंतामणी हे तक्रारदार यांना "कुठ येऊ मंग आता" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे त्यांना "रास्ता पेठेत, एक दहा मिनीटात माझ्या हातात येतात" असे म्हणाले. त्यावर पोउनि "बर... बर, एक तास लागल मला यायला" असे म्हणुन "निघतो मंग लगेच" असे म्हणाले व फोन कट केला. त्यानंतर पोनि लोणारे यांनी व्हाँईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ 12.37 वा ची होती. पोउनि चिंतामणी हे पुणे येथे येत असल्याने सदरची सापळा कारवाई ही रास्ता पेठ मधील अपोलो चौक परिसरात करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर पोनि लोणारे यांचे सुचनेवरुन सपाफौ चव्हाण यांनी लाच रक्कम ठेवलेली व अँन्थॅसिन पावडर लावलेली पिशवी तक्रारदार लोखंडे यांचे ताब्यात दिली. त्यानंतर सपोफौ चव्हाण यांना सदरच्या सापळा पथकामधुन वगळण्यात आले. त्यानंतर 12.39 वा चे सुमारास पंचांसमक्ष तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर पोलीस उप निरीक्षक चिंतामणी यांचा पुन्हा व्हाँटसअँप कॉल येत असलेबाबत सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांना फोन रिसीव्ह करणेबाबत सांगुन मोबाईन फोनचा स्पिकर ऑन करणेबाबत सुचना दिली व व्हाँईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे मोबाईल फोनसमोर धरला. त्यावेळी पोउनि चिंतामणी हे तक्रारदार यांना "म्हटंल....कुठं यायाचं म्हटले" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे पोउनि चिंतामणी यांना "रास्ता पेठ ......रास्ता पेठ" असे म्हणाले. त्यावर पोउनि चिंतामणी हे तक्रारदार त्यांना "कुठ रास्ता पेठेत, कुठ" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे पोउनि चिंतामणी यांना "सर तिथं पोचल्यावर लोकेशन पाठवतो मला ही एक्झॅक्ट त्यांनी सांगितलं नाही तिथं....म्हटले तुमच्या हातात हॅडओव्हर करतो म्हणुन मी म्हंटलं ठिकेय तिथं पोचतो ....अन तुम्हाला डायरेक्ट लोकेशन पाठवतो." असे म्हणाले. त्यावर पोउनि चिंतामणी हे तक्रारदार यांना "मी येवु काय.....मग रास्ता पेठेकडं" असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे पोउनि चिंतामणी यांना "हो... या ना सर" असे म्हणाले व फोन कट केला. आम्ही व्हाँईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ 12.39 वा होती. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 मोरे यांना लाच रकमेच्या पिशवीसह तक्रारदार यांचे दुचाकी अँक्टीव्हा वाहन क्रं एमएच 14 एवाय 8348 यावरुन, तसेच पोशि भुषण ठाकुर व पोशि रवि दिवेकर हे त्यांचे खाजगी दुचाकीवरुन, पोशि आडके व पोशि तावरे हे त्यांचे खाजगी दुचाकीवरुन तसेच पोनि लोणारे, पोनि घरबुडे व पंच क्रं 2 वागले असे शाराकीय वाहन एमएच 12 युसी 4109 यामधुन सापळा कारवाई करीता आवश्यक असलेले साहीत्य तसेच व्हीडीओ शुटींग कॅमेरा व नवीन मेमरीकार्ड सोबत घेऊन अपोलो चौक येथे रवाना झाले ती वेळ दुपारी 12.50 वा ची होती. नमुद सर्व पथक अपोलो चौक येथील पुना कॅफे हॉटेल समोर 13.05 वा चे सुमारास पोहोचलो. त्यानंतर सापळा कारवाई हि पुना कॅफे मध्ये करणेबाबत ठरविण्यात आले.



Scanned with CamScanner

त्यानंतर शुटींग करण्यासाठी कॅमेरा हा पोशि आडके यांच्या ताब्यात देवून सापळा कारवाई यशस्वी झाल्यानंतर लोकसेवक यांच्या ताब्यातुन लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईचे सलग चित्रीकरण करण्याच्या सुचना देण्यात आल्या. पुणे कॅफे हॉटेलच्या जवळ आल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 8657614438 यावरुन पिएसआय प्रमोद चिंतामणी यांचा मो.क्रं. 7620166506 यावर व्हॉटसअँपव्दारे लोकेशन पाठविले व व्हॉटसअँप कॉल करुन त्यांचे मोबाईलचा स्पिकर ऑन केला व व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे मोबाईल फोनसमोर धरला. त्यावेळी पोउपनि यांनी कॉल रिसीव्ह केला असता, तक्रारदार हे पोउपनि चिंतामणी यांना "हा सर, लोकेशन पाठवलय" असे म्हणाले. त्यावर पोउनि चिंतामणी हे तक्रारदार यांना "बर....बर.. रास्ता पेठेचं ना" असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे चिंतामणी यांना "रास्ता पेठ मध्ये पुना कॅफे वरती पहिला मजल्यावर....वरती" असे म्हणाले. त्यावर पोउनि चिंतामणी हे तक्रारदार यांना "बरं....बरं ...कुठं" असे म्हणाले त्यावर तक्रारदार लोखंडे हे चिंतामणी यांना "येस सर...पुना...पुना कॅफे.....हॉटेल पुना कॅफे" असे म्हणाले. त्यावेळी पोउनि चिंतामणी हे तक्रारदार यांना "ठिकयं....ठिकयं..." असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे पोउनि चिंतामणी यांना "किती वेळ लागेल सर.." असे म्हणाले. त्यावर ते पोउनि चिंतामणी हे तक्रारदार यांना "निघालेलोचं रस्त्यांनी" असे म्हणाले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. ती वेळ 13.16 वा. ची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना योग्य त्या सुचना दिल्या व लाचेची रक्कम स्वीकारल्यानंतर तक्रारदार लोखंडे यांनी बाहेर येऊन सापळा पथकास त्यांचे अंगात असलेल्या जर्कीन अंगातुन काढुन लाच स्वीकारल्या बाबत इशारा करावा. तसेच पंच क्रं 1 यांनी शक्य असल्यास आम्हास व्हॉटसअप मॅसेज करुन लाच स्विकारल्याचा मॅसेज करावा दिलेल्या सुचनांची उजळणी करुन आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतमधील बनियनला सेफ्टीपिनचे सहाय्याने लावुन तक्रारदार व पंच क्र.1 यांना पुना कॅफे या हॉटेलमध्ये पहिल्या मजल्यावर रवाना केले. ती वेळ 13.19 वा ची होती. उर्वरीत सर्व पथक पुना कॅफे परिसरामध्ये सापळा लावुन थांबले. दरम्यान तक्रारदार यांनी पोउनि चिंतामणी यांना फोन करुन त्यांचे लोकेशन विचारले. थोडयाच वेळात लोकसेवक पोउनि चिंतामणी हे हॉटेल पुना कॅफे येथे आले व हॉटेलच्या पहील्या मजल्यावर जावुन बसले. थोडयावेळातच तक्रारदार, पंच क्रं 1 व पोउनि चिंतामणी हे पहिल्या मजल्यावरुन खाली उतरुन हॉटेलच्या बाहेर आले. आम्ही सापळा पथकामधील अधिकारी, कर्मचारी व पंच क्रं 2 हॉटेलच्या बाहेर येऊन कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबले. पोउपनि चिंतामणी, तक्रारदार व पंच क्रं 1 असे हॉटेलपासुन पुढे काहि अंतरावर असलेल्या उंटाडया मारुती मंदिरासमोर जावुन एका रिक्षाजवळ थांबले. त्यानंतर काहिवेळात तक्रारदार यांनी परिधान केलेले जर्कीन अंगावरुन काढुन लाच रक्कम स्विकारलेबाबत इशारा केला. आम्ही पंच क्रं 1 यांना लाच रक्कम कोणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, त्यांनी तक्रारदार यांचेसमक्ष उभे असलेल्या इसमाकडे इशारा करत हेच पोलीस उप निरीक्षक चिंतामणी असुन त्यांनी तक्रारदार लोखंडे यांना लाच रक्कम रिक्षामध्ये मागील बाजुस ठेवण्यास सांगीतले असल्याचे सांगुन हॉटेलमध्ये पोउनि चिंतामणी यांनी लाच रकमेच्या पिशवीमध्ये लाचेची रक्कम तपासली असल्याचे सांगीतले. त्यावेळी पोशि प्रविण तावरे यांनी लोकसेवकाचा डावा हात व पोशि दिवेकर उजवा हात मनगटाजवळ घट्ट पकडला. त्यावेळी पोशि ठाकुर यांनी तक्रारदार यांचे ताब्यातील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 14.25 वा चे सुमारासची होती. त्याचवेळी पोशि आडके यांनी त्यांचे ताब्यातील व्हिडीओ शुटींग कॅमेराच्या सहाय्याने चित्रीकरण सुरु केले. आम्ही पोउनि चिंतामणी यांना स्वत:ची ओळख सांगुन त्यांचेविरुध्द झालेल्या सापळा कारवाईची माहिती दिली व त्यांचा पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री प्रमोद रविंद्र चिंतामणी, वय 38 वर्षे, पद- पोलीस उप निरीक्षक, नेम. आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड रा. फ्लॅट क्र.504, सोपान रेसीडेन्सी, गंगोत्री पार्क, दिघी रोड, भोसरी, पुणे असे सांगितले. पोउनि चिंतामणी यांनी रिक्षामध्ये मागील बाजुस ठेवलेली लाच रकमेची पिशवी पंच क्रं 2 यांनी ताब्यात घेतली. नमुद रिक्षा क्रमांक एमएच 12 जेएस 9077 असा असल्याचे दिसुन आले. आम्ही नमुद रिक्षा चालकास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री दिलीप बाबुराव नलावडे, वय 65 वर्षे, रा. बी 99, रुम नं 2, इआरटी कॉलेजच्या मागे, बिबवेवाडी, पुणे 37 मो. 9588699868 असा असल्याचे सांगीतले. नमुद रिक्षाचालक यांना लाप्रवि, पुणे कार्यालयात घेऊन येणेबाबत पोशि ठाकुर यांना सुचना देण्यात आली. तसेच पोउनि चिंतामणी यांनी रिक्षामधील मागील बाजुस ज्या ठिकाणी लाच रकमेची बॅग ठेवली होती, त्या ठिकाणची कृत्रीम अंधार करुन अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता सदर ठिकाणी अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी असल्याची दोन्ही पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर नमुद लोकसेवक यांना शासकीय वाहनात बसविण्यात आले. शासकीय वाहनात कृत्रिम अंधार केला व लोकसेवक चिंतामणी यांना आम्ही स्वत:चे व सापळा पथकातील अधिकारी, अंमलदार व पंच क्र.1 यांचे हात व कपडे अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात दाखवून कोणाचेही हातास अगर कपडयास अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर शासकीय वाहनात उजेड करण्यात आला. त्यानंतर पोनि लोणारे यांचे सुचनेवरुन पंच क्र.2 यांनी त्यांचे ताब्यात घेतलेली लाच



Scanned with CamScanner

रकमेच्या पिशवीमधुन पिस्ता रंगाच्या पाकिटामधुन लाच रक्कम काढुन व त्यांचेकडील नोट नंबर लिहलेला कागद बाहेर काढून त्यावरील लिहलेले नंबर व नोटांवरील नंबर यांची पाहणी केली असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर आम्ही लोकसेवक चिंतामणी यांचे हातांची व त्यांचे कपडयाची व पंच क्र.2 यांचे ताब्यातील हस्तगत लाच रक्कम अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाशात तपासणी केली असता हस्तगत लाच रकमेच्या पिशवीवर तसेच लोकसेवक चिंतामणी यांचे उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यांवर व नेसणीस असलेल्या काळ्या रंगाच्या पॅन्टचे पुढील उजव्या भागावर अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर शासकीय वाहनात उजेड करण्यात आला. वरिल सर्व घटनेचे पोशि आडके यांनी शासकीय व्हिडीओ कॅमेरामध्ये व्हीडीओ चित्रिकरण केले आहे. त्यानंतर आम्ही लोकसेवक चिंतामणी यांनी तक्रारदार लोखंडे यांचे अशिलाविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाच्या कागदपत्रांबाबत आम्हा पंचांसमक्ष विचारणा केली असता, सदर गुन्हयाच्या तपासाचे कागदपत्रे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयातील आर्थिक गुन्हे शाखा येथे असलेबाबत सांगितले. सदर कारवाईबाबत आम्ही श्री शिवाजी पवार, पोलीस उप आयुक्त, आर्थीक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांना फोनव्दारे माहिती दिली आहे.त्यानंतर पोनि घरबुडे यांनी सदर ठिकाणच्या चर्तु:सिमा कोऱ्या कागदावर लिहुन घेतल्या. पुढील कारवाई हि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे करण्याचे ठरविल्याने लोकसेवक चिंतामणी यांना ताब्यात घेऊन शासकीय वाहनाने व त्यांचेकडील दुचाकी वाहनाने लाप्रवि, पुणे कार्यालयात आले. तसेच पोशि ठाकुर हे रिक्षाचालक श्री दिलीप बाबुराव नलावडे, वय 65 वर्षे, रा. बी 99, रुम नं 2, व्हीआटी कॉलेजच्या मागे, बिबवेवाडी, पुणे 37 यांचेसह त्यांचे रिक्षाने लाप्रवि, पुणे कार्यालयात आले. आम्ही तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी व पंच क्र 1 असे हॉटेल पुना कॅफेच्या पहिल्या मजल्यावर जावुन बसलो. बराच वेळ झाला तरी लोकसेवक चिंतामणी न आलेने मी लोकसेवक चिंतामणी यांना फोन करुन स्पिकर ऑन केला. त्यावेळी लोकसेवक चिंतामणी यांनी कॉल रिसीव्ह केला असता, मी लोकसेवक चिंतामणी यांना "कुठ आले" अशी विचारणा केली. त्यावर लोकसेवक चिंतामणी हे "शिवाजीनगर" असे म्हणाले. त्यानंतर फोन कट झाला. त्यानंतर आम्ही दोघे तेथेच थांबुन राहिलो. त्यानंतर काहिवेळाने पोउनि चिंतामणी यांनी त्यांचे मोबाईलवरुन माझे मोबाईलवर कॉल केला. त्यावेळी मी कॉल रिसीव्ह केला परंतु आमचेमध्ये बोलणे झाले नाही. त्यानंतर मी माझे मोबाईलवरुन पोउनि चिंतामणी यांना फोन कॉल करुन माझ्या मोबाईलचा स्पिकर ऑन केला. तेंव्हा पोउनि चिंतामणी यांनी कॉल रिसीव्ह केला त्यावेळी त्यांनी मला "कुठ आहेत" अशी विचारणा केली त्यावेळी मी त्यांना "कॅफेत वरती" असे म्हणालो. त्यानंतर लगेच पोलीस उप निरीक्षक चिंतामणी हे पुना कॅफेमध्ये वरिल मजल्यावर आले. त्यावेळी आमचेमध्ये चर्चा सुरु असतानाच मी त्यांना "पन्नास मधुन पंच्चेचाळीस केले यांनी, आणि आपल्या चिरी-मिरीचे दिड केले यांनी, त्याच्यामध्ये मिक्सअप केले... दिड आहे त्याच्यात..." असे म्हणालो. त्यावर ते मला "हे दिड जे आहेत ना.." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "चेक करुन घ्या.. पाहिजे तर, हे जे दिड आहेत ना.. दिड वेगळे ठेवल्यात मी, तुम्ही बघु शकता, काहि प्रॉब्लेम नाही" असे म्हणालो. त्यावर ते मला "असु दया" असे म्हणत पोउनि चिंतामणी यांनी लाच रकमेच्या पिशवीची चेन उघडुन त्यामधील लाच रक्कम तपासली. त्यानंतर आम्ही सदर ठिकाणी कॉफी घेऊन निघालो. त्यावेळी त्यांनी मला पंच क्रं 1 यांचेकडे व लाच रकमेच्या पिशवीकडे इशारा करत "यांना घ्यायला लावा" असे लाच रकमेची पिशवी घेण्यातबाबत इशारा केला. त्यावेळी पंच क्रं 1 यांनी पोउनि चिंतामणी यांचेकडे इशारा करत "नाही नाही तुम्हीच घ्या" असे बोलले. त्यानंतर मी लाच रकमेची पिशवी घेऊन, पंच क्रं 1 व पोउनि चिंतामणी असे हॉटेलच्या पहिल्या मजल्यावरुन खाली उतरलो. त्यानंतर पोउनि चिंतामणी, मी व पंच क्रं 1 मोरे पुना कॅफेच्या समोरील फुट पाथवर चर्चा करीत थांबलो. त्यावेळी पोउनि चिंतामणी हे मला "थोड पुढ चला, ईथे कॅमेरे आहेत" असे म्हणाले. त्यानंतर मी, पोउनि चिंतामणी व पंच क्रं 1 तेथील उंटाडया मारुती मंदिरासमोर चालत गेलो. सदर ठिकाणी एक रिक्षा उभी होती. त्यावेळी त्यांनी रिक्षा चालकास "दिघीला जाणार आहे का" असे विचारले. त्यावेळी मी त्यांना लाच रकमेची पिशवी देत असताना त्यांनी मला रिक्षाच्या मागील बाजुस इशारा करत "ठेवा तिथे" असे म्हणाले. त्यावर मी लाच रकमेची बॅग रिक्षाच्या मागील बाजुस ठेवली व लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. पोउनि चिंतामणी हे रिक्षामध्ये बसत असताना त्यांनी सदर लाच रकमेची पिशवी एका हाताने उचलत असताना सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले. अशी हकिकत दोन्ही पंचांसमक्ष सांगितली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.तरी दिनांक 13/10/2025 रोजी तक्रारदार अॅड.प्रसन्ना गोविंद लोखंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 16/10/2025, 27/10/2025 व 28/10/2025 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांचे आशिल यांचे विरुध्द बावधान पो.स्टे. गु.र.नं. 256/2025 येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये अटक आरोपी विरुध्द मा.न्यायालयात से देण्यासाठी यातील लोकसेवक पोउनि प्रमोद रविंद्र चिंतामणी याने स्वता:साठी व त्यांचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांचे साठी दोन कोटी रुपये लाचेची मागणी करुन पहीला हप्ता म्हणुन 46,50,000/- रुपयांची लाच पंचासमक्ष 14.25 वा. उंटाडया



Scanned with CamScanner

मारुती मंदीरासमोर, रास्ता पेठ,पुणे येथे स्विकारली म्हणुन माझी पोउनि प्रमोद रविंद्र चिंतामणी, नेम. अर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड आयुक्तालय, पुणे यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7,7(अ), प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

UMESH AMBADAS GITTE(I (Inspector)) / DCPSNO15101000402UAGM84010

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
समर्थ पोलीस स्टेशन पुणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): UMESH AMBADAS G
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DCPSNO15101000402L



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | Tattoo (गोदण) | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner